# डॉ. आंबेडकर सर्वार्थाने राष्ट्रीय नेते

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन; 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केवळ दलितांचा नेता म्हणणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील घोर अन्याय आहे. डॉ. आंबेडकरांचे भारतीय समाजाप्रती राष्ट्रीय योगदान पाहिले, तर ते सर्वश्रेष्ठ भारतीय होते, ते सर्वार्थाने राष्ट्रीय नेते होते, असे प्रतिपादन नामवंत अर्थशास्त्रज्ञ, खा. डॉ. नरेंद्र जाधव यांनी शुक्रवारी येथे केले. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात मतभेद होते. मात्र, व्यक्तीपेक्षा देश मोठा असतो, हे या महात्मा आणि महामानवाने दाखवून दिल्याचेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

दैनिक 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या २९ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेंतर्गत शुक्रवारी (दि. २०) नामवंत अर्थशास्त्रज्ञ, खा. डॉ. नरेंद्र जाधव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'महामानव डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय कार्य' या विषयावर डॉ. जाधव बोलत होते. शाहू स्मारक भवन येथे झालेल्या व्याख्यानाला अलोट गर्दी झाली होती. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते. व्यासपीठावर दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव उपस्थित होते.

**प्रत्येक विषयात, क्षेत्रात राष्ट्रीय स्वरूपाची कामगिरी**

डॉ. जाधव म्हणाले, ज्या-ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार होतो, त्यांच्याविषयी काही बोलले जाते, त्या-त्यावेळी भारतीय जनमानसांत त्यांची पहिली प्रतिमा काय असते? त्यांची पहिली प्रतिमा असते, ती डॉ. आंबेडकर हे केवळ दलितांचे कैवारी होते. अर्थात, डॉ. आंबेडकर दलितांचे कैवारी होतेच; पण त्यापेक्षाही खूप काही जास्त होते. दुसरी प्रतिमा काय असते, तर डॉ. आंबेडकर संविधानाचे शिल्पकार होते. ते संविधानाचे प्रधान शिल्पकार होतेच; पण एवढीच त्यांची मर्यादित ओळख नव्हती. डॉ. आंबेडकर हे खऱ्या अर्थाने प्रज्ञासूर्य होते, त्यांना दिशांचे बंधन नव्हते. प्रत्येक विषयात, क्षेत्रात त्यांनी राष्ट्रीय स्वरूपाची कामगिरी केली.




**कोल्हापूर : दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शाहू स्मारक येथे शुक्रवारी आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत बोलताना नामवंत अर्थशास्त्रज्ञ, खा. डॉ. नरेंद्र जाधव. यावेळी व्यासपीठावर डावीकडून उपस्थित महाविद्यालय विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

**(छाया : पप्पू अत्तार)**

**डॉ. आंबेडकर मूलतः अर्थशास्त्रज्ञ**

डॉ. जाधव म्हणाले, डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. त्यांचे शिक्षण पाहिले तर मूलतः ते अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी ज्या पदव्या मिळवल्या, त्यातील 'बॅरिस्टर' ही एक पदवी सोडली तर त्यांच्या सर्व पदव्या अर्थशास्त्रातील होत्या. १९१५ साली ते अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले. तिथे एम.ए.ची पदवी घेतली ती अर्थशास्त्रातून. १९१७ साली त्याच विद्यापीठात अर्थशास्त्रातून त्यांनी पीएच.डी. केली. पुढे ते इंग्लंडला गेले. तिथे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगद्विख्यात संस्थेमध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स'ची पदवी मिळवली ती अर्थशास्त्रातूनच. ही पदवी घेताना त्यांनी कायद्याचाही अभ्यास केला आणि 'बॅरिस्टर' ही पदवी मिळवली, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

**देशातील सर्वात प्रभावी अर्थतज्ज्ञ**

आपल्या देशातील सर्वाधिक शिक्षित, सर्वात प्रशिक्षित अणि सर्वात प्रभावी अर्थतज्ज्ञ कोण असेल, तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते, असे सांगत डॉ. जाधव म्हणाले, डॉ. आंबेडकरांनी पीएच.डी.साठी दोन ग्रंथ लिहिले. 'ब्रिटिशकालीन प्रांतीय विकेंद्रित साम्राज्यवादी अर्थव्यवस्था' या ग्रंथाद्वारे डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश केंद्र व पान ९ वर ▶

# डॉ. आंबेडकर सर्वार्थाने राष्ट्रीय नेते



कोल्हापूर : दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शाहू स्मारक येथे शुक्रवारी आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेस उपस्थित जनसमुदाय.

(पान १ वरून) राज्य सरकारमधील आर्थिक संबंधांची चिकित्सा करून त्यात सुधारणा सुचवली. आजच्या घडीला हे महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारकडे जमा होणारा पैसा राज्याला किती द्यायचा, हे ठरवण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमला जातो. आजपर्यंत १४ वित्त आयोग होऊन गेले, त्यांच्या अहवालाचे मूळ डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथात होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज केंद्र व राज्य यांच्यातील अर्थ संबंधाला वेगळे परिणाम देण्याचा प्रयत्न करतात, त्याचाही आधार डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ असल्याचेही त्यांनी सांगितले.

**विनिमयाविषयी चिकित्सक अभ्यास**

ते म्हणाले, 'रुपयाची समस्या; उद्‌गम आणि उपाय' या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी विनियमाचे परिमाण म्हणून जडणघडण कशी होत गेली, याचा चिकित्सक अभ्यास केला. विकसनशील देशासाठी आदर्श चलनपद्धती म्हणून गोल्ड स्टँडर्ड लवचिक पद्धतीला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला. लवचिक पद्धत ही दुधारी अस्त्रासारखी आहे, सरकारवर बंधने येणार नाही, ही एक गोष्ट चांगली असली तरी सरकार बेजबाबदार असेल तर अनियंत्रित चलननिर्मिती होईल आणि त्यातून गरिबांचे कंबरडे मोडेल, असे बाबासाहेबांनी ठामपणे सांगितले होते.

**कामगार नेता म्हणून प्रभावी**

कामगार नेता म्हणूनही डॉ. आंबेडकरांनी प्रभावी काम केले, असे सांगत डॉ. जाधव म्हणाले, १९२४ साली ३० संप झाले, त्या संपांना डॉ. आंबेडकरांनी विरोध केला होता. हे संप राजकीय हेतूने असल्याची त्याची भावना होती. कम्युनिस्ट पक्ष ही चळवळ कामगारांच्या हक्कासाठी लढत आहेत. मात्र, कामगारांची माणूस ही ओळख आहे, त्यांच्या मानवाधिकारासाठी लढा पाहिजे. या भावनेतून डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

**जाती व्यवस्थेची आर्थिक, सामाजिक अंगाने प्रथमच चिकित्सा**

हिंदू धर्माच्या चौकटीत राहून डॉ. आंबेडकरांना धर्म परिवर्तन करायचे होते, असे सांगत डॉ. जाधव म्हणाले, चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने डॉ. आंबेडकर यांच्या समतेच्या संघर्षाची सुरुवात झाली. मानवी हक्क मिळाले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. मात्र, दहा वर्षांनंतर सुधारणा होत नाही, यामुळे हा धर्म बदलू शकणार नाही, अशी धारणा झाल्याने येवला (जि. नाशिक) येथे त्यांनी धर्मांतरांची घोषणा केली.

त्यानंतर २१ वर्षांनंतर त्यांनी धर्मांतर केले. त्या २१ वर्षांत डॉ. आंबेडकरांनी सर्व धर्मांचा चिकित्सक अभ्यास केला. आजपर्यंत तलवारीच्या धाकाने अथवा आमिषाने धर्मांतर झाले. मात्र, एका नेत्याच्या शब्दावर, पाच ते सात लाख लोकांनी धर्मांतर केले, हे सर्वच विलक्षण असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

लाहोर येथील जात-पात तोडफोड मंडळाच्या वतीने डॉ. आंबेडकरांना भाषणासाठी बोलवले होते. त्यावेळी त्यांच्या भाषणाची लिखित प्रत आयोजकांनी मागवली होती. 'जाती निर्मूलन' या नावाने लिहिलेल्या या भाषणात जाती व्यवस्था नष्ट करायच्या असतील, तर सर्व धर्मग्रंथांना सुरूंग लावला पाहिजे, अशी त्यांनी भूमिका मांडली होती. मात्र, बाबासाहेबांच्या भूमिकेमुळे ही परिषदच रद्द झाली. नंतर हेच भाषण जाती निर्मूलन नावाने प्रसिद्ध झाले.त्यावर महात्मा गांधींनी कडवट टीका केली होती.

गांधी यांनी चातुर्वर्ण्याचे समर्थन केले होते. ही श्रमाची विभागणी आहे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यावर बाबासाहेबांनी ही श्रमिकांची विभागणी असल्याचे सांगितले.

जाती व्यवस्थेची आर्थिक आणि सामाजिक अंगाने बाबासाहेबांनी चिकित्सा केली होती, ती अन्य कोणत्याही अर्थतज्ज्ञांनी केली नव्हती, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

**महात्मा, महामानवांनी व्यक्तीपेक्षा देश मोठा मानला**

गोलमेज परिषदेनंतर डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांची मुंबईत भेट झाली होती. त्यावेळी त्यांच्यात मतभेद निर्माण झाले होते.

अस्पृश्य निवारणासाठी २० लाखांचा निधी संकलित करत आहोत, असे गांधी यांनी सांगताच, डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य निवारणासाठी निधी देण्यापेक्षा जोपर्यंत अस्पृश्यता मानणार नाही, तोपर्यंत काँग्रेसमध्ये प्रवेश मिळणार नाही, अशी काँग्रेस सदस्यांना अट घाला, अशी थेट मागणी त्यांनी गांधी यांच्याकडे केली होती.

अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नावरून डॉ. आंबेडकर आणि गांधी यांच्यात अनेकदा तीव्र मतभेद झाले. मात्र, राज्यघटना निर्मिती तसेच मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांचा समावेश करण्याची सूचना महात्मा गांधी यांचीच होती. पहिल्या मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांचे नाव नसल्याचे समजताच गांधी यांनी ही यादीही पाहिली नव्हती. यामुळे पंडित नेहरू यांना पेन्सिलने यादीत डॉ. आंबेडकरांचे नाव लिहून ती गांधी यांना दाखवावी लागली. यानंतर डॉ. आंबेडकर कायदामंत्री झाले. महात्मा आणि महामानव यांनी व्यक्तीपेक्षा देश मोठा असतो, हे दाखवून दिल्याचेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

**डॉ. ग. गो. जाधव यांचा जीवनप्रवास थक्क करणारा : कुलगुरू**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांची महत्त्वाची भूमिका आहे. सामाजिक, आर्थिक, पत्रकारितेच्या क्षेत्रात कर्तृत्वाची मुद्रा उमटविणारे डॉ. ग. गो. जाधव यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे.

महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे यांचा सहवास त्यांना लाभल्याने सामाजिक जाणिवेचे संस्कार त्यांच्यावर झाले. ही जाणीव त्यांच्या पत्रकारितेतून पदोपदी झळकताना दिसते. डॉ. ग. गो. जाधव यांची गौरवशाली परंपरा, सामाजिक कार्याचा वसा आणि वारसा पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव आणि डॉ. योगेश जाधव सक्षमपणे पुढे चालवित आहेत, असे गौरवोद्‌गार यावेळी त्यांनी काढले.

प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दै. 'पुढारी' परिवाराच्या वतीने डॉ. योगेश जाधव यांच्या हस्ते डॉ. नरेंद्र जाधव यांचा सत्कार करण्यात आला. बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले व पाहुण्यांचा परिचय करून दिला. रसिका कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

## राज्यघटनेसाठी एकहाती काम

भारतीय राज्य घटनेसाठी नेमलेल्या मसुदा समितीत सात सदस्य होते. त्यापैकी दोन नेहमी आजारी असत, दोन कधीच येत नव्हते. एक परदेशी होते आणि एकाचा मृत्यू झाला. यामुळे संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकरांवर होती. ती त्यांनी पार पाडलीच; पण संविधान सभेच्या २९२ सदस्यांसमोर घटनेतील प्रत्येक प्रस्ताव मांडून त्याच्या दोन्ही बाजूंवर चर्चा घडवून त्यामध्ये मतैक्य करण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकरांवर होती. ते भीमधनुष्यही त्यांनी लिलया उचलले आणि घटनेतील सर्व प्रस्ताव एकमताने मंजूर करून घेतले. हे डॉ. आंबेडकरांचे काम म्हणजे भारतीयांवर उपकारच असल्याचेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

## अर्थ प्रशासक म्हणून प्रभावी कामगिरी

महात्मा गांधी यांनी 'चले जाव'चा नारा दिला. त्यावेळी ब्रिटिशांनी आपल्या मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांचा समावेश केला. त्यांच्याकडे कामगार, बांधकाम, जल व्यवस्थापन, ऊर्जा आणि खनिज व्यवस्थापन अशी पाच महत्त्वाची खाती दिली. त्या प्रत्येक विभागात डॉ. आंबेडकरांनी अत्यंत प्रभावी काम केले. सेवा योजना कार्यालये, कौशल्य विकास केंद्रांची स्थापना, कामाचे आठ तास, पगारी सुट्ट्या, महिलांसाठी प्रसूतीपूर्व रजा, केंद्रीय जलआयोग, दामोदर व्हॅली प्रकल्प, विविध भागात धरणे आदी डॉ. आंबेडकरांच्या कामांची अनेक उदाहरणे देता येतील, असे सांगत डॉ. आंबेडकरांनी अर्थ प्रशासक म्हणून प्रभावी काम केल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

## स्त्री-पुरुष समानतेसाठी राजीनामा देणारा मंत्री

डॉ. आंबेडकरांनी कायदा मंत्री असताना, हिंदू कोड बिल आणले. महिलांना समानतेचा दर्जा देणारा हा क्रांतिकारक निर्णय होता. मात्र, काँग्रेस आणि विरोधी पक्षातील सनातनी एकत्र आले, त्यांनी विरोध करत तीन वर्षे हे बिल मंजूर होऊ दिले नाही. पंडित नेहरूंनी सरकार पडले तरी चालेल; पण हे बिल मंजूर करू, अशी भूमिका प्रारंभी घेतली होती. मात्र, नंतर त्यांनी हे बिल मंजूर होणार नाही, असे सांगितल्यानंतर बाबासाहेबांनी राजीनामा दिला होता. महिलांना समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता; पण महिलांना त्यांचे स्मरण होत नाही, ही शोकांतिका असल्याचेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

## सभागृह हाऊसफुल्ल

व्याख्यान सुरू होण्यापूर्वीच शाहू स्मारक भवन खचाखच भरून गेले होते. जागा मिळेल तिथे बसून, उभे राहून श्रोत्यांनी भाषण पूर्णवेळ ऐकले. आपल्या ४५ मिनिटांच्या भाषणात डॉ. जाधव यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. भाषण सुरू असताना संपूर्ण सभागृह त्यांनी खिळवून ठेवले होते. शाहू स्मारकाच्या आवारातही लोक थांबून भाषण ऐकत होते.

## डॉ. ग. गो. जाधव विचारनेते

डॉ. ग. गो. जाधव यांनी प्रबोधनाचे काम केले. बहुजनांचे संघटन केले. त्यांचे कार्य मनापासून भावले, असे सांगत डॉ. ग. गो. जाधव विचारनेते होते, असे गौरवोद्‌गार डॉ. नरेंद्र जाधव यांनी काढले. प्रास्ताविक भाषणात प्राचार्य डी. आर. मोरे यांनी डॉ. ग. गो. जाधव यांनी स्वतंत्र विद्यापीठाची आणि त्याला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्याची सर्वप्रथम कल्पना मांडली, त्याचा १९३३ पासून पाठपुरावा केला. डॉ. ग. गो. जाधव यांचे स्वप्न १९६२ ला पूर्ण झाले. त्यांच्या कार्याचा वसा आजही 'पुढारी' जपत असल्याचे सांगितले.

## डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेतील भाषणांचा ग्रंथ प्रकाशित करणार

विद्यापीठाच्या निर्मितीसाठी डॉ. ग. गो. जाधव यांचे मोठे ऋण आहेत. त्यांच्या उपकाराचे स्मरण राखण्यासाठी विद्यापीठाने ही व्याख्यानमाला सुरू केली. गेली २८ वर्षे नियमितपणे सुरू असलेल्या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रांतील चिंतनशील व्यक्तींनी मौलिक विचार प्रकट केले आहेत. व्याख्यानमालेतील संग्रहित २५ व्याख्यानांचा समावेश असणारा ग्रंथ शिवाजी विद्यापीठाच्या वतीने लवकरच प्रकाशित करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली.

## चलनी नोटेवर बाबासाहेबांच्या छायाचित्राला तत्त्वतः मान्यता

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मोठे आहे. यामुळे चलनी नोटांपैकी एका नोटेवर डॉ. आंबेडकरांचे छायचित्र प्रसिद्ध करावे, अशी मागणी आपण केली आहे. त्याला तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. आता त्याचा पाठपुरावा करावा लागणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.


**कोल्हापूर महानगरपालिका : आरोग्य विभाग**

**जाहीर शुद्धीपत्रक**

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागातर्फे दि. १९/५/२०१६ रोजी पी.सी.पी.एन.डी. कायद्याखाली रजिस्ट्रेशन (नोंदणी) बाबतची जाहीर सूचना प्रसारित करणेत आलेली होती. सदर जाहिरातीमध्ये एक्स-रे मशिन्सचा अनावधानाने उल्लेख झालेला असून निव्वळ एक्स-रे मशिन्सचे रजिस्ट्रेशन करणे आवश्यक नाही. परंतु, सर्व सोनोग्राफी मशिन्स, इमेजिंग मशिन्स बरोबरच सर्व प्रकारचे स्कॅनर (एम.आर. आय. मशिन, सिटीस्कॅन मशिन, ऑपथॅलमिक स्कॅनर इ.) मशिन्स - ज्यांच्या आधारे लिंग निदान आणि लिंग निवड होऊ शकते - अशा सर्व मशिन्सची पी.सी.पी.एन.डी. कायद्याखाली नोंदणी होणे आवश्यक आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
आरोग्याधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका

**कोल्हापूर महानगरपालिका, (सार्वजनिक बांधकाम विभाग)**

**जाहीर निविदा नोटीस क्र. २६**

**मध्य रेल्वे**
**पुणे विभाग**

**अधिसूचना**
**सूचना क्र. पीए/कमर्शिअल/हॉल्ट कॉन्ट्रॅक्ट/16 दि. 20.05.2016**


भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक खालील वर्णन केलेल्या कामासाठीच्या अटी पूर्ण करणाऱ्या स्वतंत्र इच्छुक कंत्राटदारांकडून निविदा अर्ज मागवित आहेत. **कामाचे नांव:** मांजरीबुद्रुक, मालाडगांव, सिरसाई, काटफळ, कान्हे आणि विश्रामबाग या 06, एफ प्रवर्गातील हॉल्ट स्थानकांवर कमिशन तत्वावर रेल्वे तिकिटांच्या विक्रीसाठी हॉल्ट कंत्राटदाराची नेमणूक **कालावधी:** 5 वर्षे **कार्यालयाचा पत्ता (निविदा फॉर्म विक्री, सादरीकरण आणि उघडण्याची जागा):** वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक यांचे कार्यालय, पहिला मजला, नवीन डीआरएम कार्यालय, आरबीएम रोड, ला मेरिडियन हॉटेलजवळ, पुणे-411001 **वैधता:** 90 दिवस, **निविदा फॉर्मची किंमत:** रु. 250/- (विनापरतावा), **निविदा फॉर्म उपलब्ध होण्याची मुदत:** 20.05.16 ते 21.06.16 दरम्यान स. 11.00 ते सायं. 5.00 या वेळेत सर्व कार्यालयीन दिवशी **सादरीकरणाची अंतिम तारीख :** 22.06.2016 रोजी दु. 3.30 पर्यंत **निविदा उघडण्याची तारीख व वेळ :** 22.06.2016 रोजी दु. 3.45 वा. **बयाणा रक्कम :** रु. 15000/- काटफळसाठी, रु. 20000/- सिरसाई, मालाडगांवसाठी, रु. 25000/- कान्हे, मांजरीगांव आणि विश्रामबागसाठी **बयाणा रक्कम आणि निविदा अर्जाची किंमत अदा करण्याची पद्धत:** I) स्थानक व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे

**नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन** : शिवाजी विद्यापीठ आयोजित डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

# आंबडेकर केवळ दलित नेते नसून सर्वश्रेष्ठ भारतीय

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ दलितांचे नेते म्हणणे हा त्यांच्यावर अन्याय असून, त्यांचे भारतीय समाजाप्रती एकूण राष्ट्रीय योगदान पाहता ते सर्वश्रेष्ठ भारतीय होते, असेच म्हणावे लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ खासदार डॉ. नरेंद्र जाधव यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित पुढारीचे संस्थापक डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय कार्य' या विषयावर ते बोलत होते. शाहू स्मारक भवनात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. व्यासपीठावर बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव उपस्थित होते.




कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शाहू स्मारक येथे आयोजित डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत ज्येष्ठ अर्थतज्ञ खा. डॉ. नरेंद्र जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर डावीकडून बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय.पाटील, 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संचालक योगेश जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणत की, मी प्रथमतः भारतीय आहे, नंतरही भारतीय आहे आणि अंतिमत:ही भारतीय आहे. स्वत:च्या भारतीयत्वाविषयी इतक्या नि:संदिग्धपणे आणि अभिमानपूर्वक प्रतिपादन करणारा नेता या देशात दुसरा झाला नाही. या तीव्रतर भारतीयत्वाच्या जाणिवेतून भारतीय राज्यघटनेची अमोल देणगी त्यांनी भारतीय समाजाला प्रदान केली, हे त्यांचे भारतीय समाजावर थोर उपकार आहेत, याची जाणीव आपण बाळगली पाहिजे. डॉ. आंबेडकर हे दलितांचे नेते, कैवारी होतेच, तसेच राज्यघटनेचे शिल्पकारही होते; पण त्यापुढे जाऊन ते एक थोर विधिज्ञ आणि महत्त्वाचे म्हणजे सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञही होते. बाबासाहेबांनी कायद्याचा अभ्यास केला असला तरी त्यांचे सर्व प्रबंध आणि पदव्या अर्थशास्त्रातील आहेत. त्यामुळेच ते भारताचे सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञ असल्याचे स्पष्ट होते.

### २५ व्याख्यानांचा ग्रंथ

डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेत विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी आपले मौलिक विचार प्रकट केले आहेत. यामधील निवडक २५ व्याख्यानांचा समावेश असणारा ग्रंथ शिवाजी विद्यापीठाच्यावतीने प्रकाशित करण्याची घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अध्यक्षीय भाषणात केली.

डॉ. जाधव म्हणाले, 'बाबासाहेब आणि महात्मा गांधी यांच्यात अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भातील भूमिकांमुळे वेळोवेळी राजकीय आणि तात्त्विक मतभेद उद्भवले. तरीही बाबासाहेबांचा भारतीय मंत्रिमंडळातील प्रवेश हा महात्मा गांधी यांच्या आग्रहामुळेच होऊ शकला, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. दोघांमधील संबंध कटुतेचे असले तरी व्यक्तीपेक्षा देश मोठा, हा संदेश देणारी कृती गांधीजींची राहिली, हे लक्षात घेतले पाहिजे.

विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. रसिका कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. (प्रतिनिधी)

तरुण भारत 23 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी डॉ. अर्जुन चव्हाण यांची निवड

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातील प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांची ' भारत, मॉस्को व ताश्कंद येथे आंतरराष्ट्रीय हिंदी चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. या चर्चासत्रासाठी ते बुधवारी रशियाला रवाना झाले.

भूमंडलीकरण के दौर में भारतीय, उजबेकी एवं रशियन भाषा, साहित्य एवं संस्कृति" या विषयावर २० ते २९ मे या कालावधीत मॉस्को व ताश्कंद येथे या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. मुंबईतील एस.एस.आर.आय., रशियन राजकीय मानव्यशास्त्र विद्यापीठ, मॉस्को–रशिया आणि लाल बहादूर शास्त्री भारतीय सांस्कृतिक केंद्र, ताश्कंद यांच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रासाठी डॉ. अर्जुन चव्हाण यांना चर्चासत्राचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व विषयतज्ज्ञ म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. या चर्चासत्रात "भारत एवं रूस का अंत:संबंध" (भाषा, साहित्य एवं संस्कृति के परिप्रेक्ष्य में) हा शोधनिबंध सादरीकरणासाठी स्वीकृत केलेला आहे.



डॉ. अर्जुन चव्हाण यांची आत्तापर्यंत ३५ हून अधिक समीक्षात्मक, मौलिक, संपादित व अनुवादित पुस्तके प्रकाशित झालेली असून २०० हून अधिक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद व कार्यशाळा इ.मध्ये अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, विषयतज्ज्ञ इत्यादी भूमिकेतून त्यांनी सहभाग घेतला आहे. त्यांच्या अनुवाद चिंतन या ग्रंथासाठी राज्य हिंदी साहित्य अकादमीचा पुरस्कार तसेच अनुवाद समस्याएं एंव समाधान या ग्रंथासाठी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.